**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**
(A Government of Maharashtra Enterprise)

क्रमांक : प्रशा/आस्था-१/प्र.क्रं.६१५/न.क्र.५८१/1948 दिनांक 20 AUG 2025

## आदेश

विषय :- मंजूर आकृतीबंधाचे अनुषंगाने नाशिक प्रदेशात अतिरिक्त झालेल्या वनरक्षक यांचे आंतरप्रदेश स्थानांतरण व पदस्थापना.

संदर्भ:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एफडीसी-२०२२/प्र.क्र.१४१/फ-५, दि.०९/०६/२०२५
२) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/आस्था-१/न.क्र.७१/प्र.क्र.१२५/१२१४, दि. २४/०६/२०२५
३) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/आस्था-१/न.क्र.५८१/प्र.क्र.६१५/१६५२, दि. २३/०७/२०२५
४) प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश यांचे पत्र क्र.प्राव्य/नाप्रना/आस्था/२०२५-२६/८२४, दिनांक १९/०८/२०२५

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये एफडीसीएम लिमिटेड मधील पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून एकूण १३५१ पदांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. मंजूर आकृतीबंधानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये प्रदेश/ विभागवार पदांचे वाटप करण्यात आले आहे.

प्रदेशनिहाय **वनरक्षक** यांची मंजूर, भरलेली व रिक्त/ अतिरिक्त पदे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | प्रदेश | मंजूर | भरलेली | शेरा |
|---|---|---|---|---|
| **१** | **नाशिक** | **६६** | **७७** | **११ पदे अतिरिक्त** |
| २ | चंद्रपूर | २१३ | १०० | ११३ पदे रिक्त |
| ३ | नागपूर | २०६ | १३८ | ६८ पदे रिक्त |

**२.०** उक्त तपशिलां नुसार नाशिक प्रदेशात मंजूर आकृतीबंधानुसार वनरक्षकांची **११** पदे अतिरिक्त झालेले आहेत. त्यामुळे मंजूर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त कार्यरत वनरक्षक पदांचे वेतन व भत्ते अदा करण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्याअनुषंगाने नाशिक प्रदेशात अतिरिक्त झालेल्या वनरक्षक यांचे चंद्रपूर व नागपूर प्रदेशात प्रशासकीय कारणास्तव स्थानांतरण करण्याच्या दृष्टीने संबंधिताकडून पसंतीक्रम घेवून या कार्यालयास त्वरित सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश, नाशिक यांनी संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये नाशिक प्रदेशात अतिरिक्त झालेल्या वनरक्षकांची यादी सादर केली आहे.

**३.०** सबब चंद्रपूर व नागपूर प्रदेशातील क्षेत्रीय कामाची व्याप्ती व प्रशासकीय निकड, संबंधित पदाशी निगडीत कामाचे स्वरुप तसेच जबाबदा-या व त्यासाठी कर्मचारी विशेष यांची उपयोगिता इत्यादी बाबींचा विचार करुन नाशिक प्रदेशात अतिरिक्त ठरणा-या वनरक्षकांचे प्रशासकीय कारणास्तव आंतरप्रदेश स्थानांतरण व पदस्थापना पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वनरक्षकांचे नाव | कार्यरत वन प्रकल्प विभाग | स्थानांतरणानंतर पदस्थापनेचा प्रदेश |
|---|---|---|---|
| १ | श्री आकाश विष्णू लोणारे | नाशिक | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |
| २ | श्री कुंदन पांडूरंग राठोड | नाशिक | नागपूर प्रदेश, नागपूर |
| ३ | श्री महेश मच्छिंद्र एकशिंगे | पुणे | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री कृष्णा सुरेश एकशिंगे | नाशिक | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |
| ५ | श्रीमती मंजूश्री नामदेवराव शिंदे | नाशिक | नागपूर प्रदेश, नागपूर |
| ६ | श्री राजू दिगंबर राठोड | ठाणे | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |
| ७ | श्रीमती गितांजली जयराम नारनाळीकर | ठाणे | नागपूर प्रदेश, नागपूर |
| ८ | श्री भुषण शिवाजी सोनवणे | ठाणे | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |
| ९ | श्री नामदेव जगन्नाथ मरकड | पुणे | चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर |
| १० | श्रीमती निराशा रमेश पाटील | नाशिक | नागपूर प्रदेश, नागपूर |
| ११ | श्री संदिप राजेंद्र पाटील | ठाणे | नागपूर प्रदेश, नागपूर |

४.० प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपूर / नागपूर प्रदेश यांनी उक्त वनरक्षकांचे पुढील पदस्थापनेचे आदेश त्यांचे स्तरावरुन विनाविलंब निर्गमित करावे. प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश, नाशिक यांनी तात्काळ संबंधित वनरक्षकांना कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी व वनरक्षकांना आवंटीत प्रदेशात रुजू होणे करीता निर्देश देण्यात यावे.

५.० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येईल.

६.० नियंत्रक अधिकारी यांनी अनुपालन अहवाल सत्वर सादर करावा.

20/8/25

(नरेश झुरमुरे)
**व्यवस्थापकीय संचालक**

प्रति,
प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व),
एफडीसीएम लिमिटेड,

**प्रतिलिपी:- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

१) विभागीय व्यवस्थापक, नाशिक/ पुणे/ ठाणे.
२) वरीलप्रमाणे संबंधित वनरक्षक (सर्व)
३) आदेश फाईल.
४) एफडीसीएम संकेत स्थळ www.fdcm.co.in